www.prepp.in

Prepp
Your Personal Exams Guide

UPSC CSE 2022 MAINS PAPER 6 SEPTEMBER 25, 2022 MARATHI OPTIONAL PAPER-I QUESTION PAPER

# मराठी (प्रश्न-पत्र–I)

( साहित्य )

वेळ : तीन तास

कमाल अंक : 250

## प्रश्नपत्रिकेबाबतच्या ठळक सूचना

**उत्तरपत्रिका लिहिण्यापूर्वी कृपया पुढील सूचना काळजीपूर्वक वाचाव्यात**

**आठ** प्रश्नांची विभागणी दोन भागांमध्ये केलेली आहे.

उमेदवाराला एकूण **पाच** प्रश्न सोडवावयाचे आहेत.

प्रश्न क्रमांक **1** आणि **5** हे अनिवार्य आहेत. आणि उर्वरित प्रश्नांपैकी **तीन** प्रश्न सोडवताना प्रत्येक विभागातील किमान **एक** तरी प्रश्न सोडवणे आवश्यक आहे.

प्रश्नासमोर गुण दिलेले आहेत.

मराठीतच उत्तरे लिहावीत.

ज्या प्रश्नांमध्ये शब्दमर्यादा उल्लेखलेली असेल, तिचे कटाक्षाने पालन करावे.

प्रश्न सोडविण्याचे प्रयत्न अनुक्रमानेच गृहीत धरले जातील. एखाद्या प्रश्नाचा अंश जरी सोडविलेला असेल, तरी जर तो खोडलेला नसेल तर गृहीत धरला जाईल. कोणतेही पृष्ठ अथवा पृष्ठाचा काही भाग प्रश्नोत्तरपुस्तिकेत कोरा सोडला असेल, तर त्यावर काट मारावी.

# MARATHI (PAPER—I)

( LITERATURE )

Time Allowed : Three Hours

Maximum Marks : 250

## QUESTION PAPER SPECIFIC INSTRUCTIONS

**Please read each of the following instructions carefully before attempting questions**

There are EIGHT questions divided in two Sections.

Candidate has to attempt FIVE questions in all.

Question Nos. **1** and **5** are compulsory and out of the remaining, THREE are to be attempted choosing at least ONE question from each Section.

The number of marks carried by a question/part is indicated against it.

Answers must be written in MARATHI.

Word limit in questions, wherever specified, should be adhered to.

Attempts of questions shall be counted in sequential order. Unless struck off, attempt of a question shall be counted even if attempted partly. Any page or portion of the page left blank in the Question-cum-Answer Booklet must be clearly struck off.

www.prepp.in

Prepp
Your Personal Exams Guide

## SECTION—A

**1.** पुढील प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी सुमारे एकशेपन्नास (*150*) शब्दांत लिहा : 10×5=50

(*a*) भाषेचे स्वरूप स्पष्ट करून 'हॉकेट' प्रणीत भाषेची लक्षणे सांगा.

(*b*) प्रमाणभाषा आणि बोली यांच्यातील साम्यभेद विशद करा.

(*c*) बोली अभ्यासाचे महत्त्व सांगून अहिराणीची भाषिक वैशिष्ट्ये सांगा.

(*d*) मराठीतील विभक्तींचे त्यांच्या प्रत्ययार्थासह स्वरूप स्पष्ट करा.

(*e*) लोकनाट्याची वैशिष्ट्ये सांगून 'तमाशा' व 'दंढार' या लोकनाट्य प्रकारांची ओळख करून द्या.

**2.** पुढील प्रश्नांची उत्तरे लिहा :

(*a*) 'भाषा ही ध्वनिसंकेतांनी बनलेली संप्रेषण प्रणाली आहे' या विधानाची सार्थकता पटवून द्या. 20

(*b*) 'मराठी भाषेला फार्सीने प्रभावित केले' हे सतराच्या शतकातील भाषेच्या आधाराने स्पष्ट करा. 15

(*c*) लोकगीताचा अर्थ सांगून मराठी लोकगीतांची वैविध्यता पटवून द्या. 15

**3.** पुढील प्रश्नांची उत्तरे लिहा :

(*a*) भाषा भिन्नतेची प्रमुख कारणे विशद करा. 20

(*b*) प्रयोग म्हणजे काय? प्रयोगाचे प्रकार सांगून कर्मणी प्रयोगाचा सोदाहरण परिचय द्या. 15

(*c*) लोककथा म्हणजे काय? लोककथांचे स्वरूप-विशेष वर्णन करा. 15

**4.** पुढील प्रश्नांची उत्तरे लिहा :

(*a*) तेराव्या शतकातील मराठी भाषेचे स्वरूप-विशेष स्पष्ट करा. 20

(*b*) शब्दांच्या जाती किती आणि कोणत्या? हे सोदाहरण लिहा. 15

(*c*) वऱ्हाडी बोलीची भाषावैशिष्ट्ये सोदाहरण स्पष्ट करा. 15

www.prepp.in

Prepp
Your Personal Exams Guide

## SECTION—B

**5.** पुढील प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी सुमारे एकशेपन्नास (*150*) शब्दांत लिहा : 10×5=50

(*a*) मराठी साहित्यातील महानुभावांच्या गद्य साहित्यकृतींचे स्थान निश्चित करा.

(*b*) वारकरी संप्रदायातील संतांचे सामाजिक व सांस्कृतिक योगदान स्पष्ट करा.

(*c*) शाहिरीकाव्याचा अर्थ सांगून शाहीर अनंत फंदी यांच्या काव्याची वैशिष्ट्ये सांगा.

(*d*) साहित्याच्या स्वरूप आणि कार्याची चर्चा करा.

(*e*) स्त्रीवादी साहित्याची संकल्पना स्पष्ट करून त्याचे स्वरूप विशद करा.

**6.** पुढील प्रश्नांची उत्तरे लिहा :

(*a*) पंडिती कवितेचे निराळेपण सांगून रघुनाथ पंडिताच्या आख्यान काव्याची वैशिष्ट्ये सांगा. 20

(*b*) साहित्याच्या मूल्यमापनाची आवश्यकता प्रतिपादन करा. 15

(*c*) 'सामाजिक जाणिवेच्या कवितेने आधुनिक मराठी कविता अधिक समृद्ध केली' या विधानाची सार्थकता सोदाहरण स्पष्ट करा. 15

**7.** पुढील प्रश्नांची उत्तरे लिहा :

(*a*) स्वातंत्र्योत्तर कालखंडात झालेल्या कथावाङ्मयातील बदलाचे स्वरूप विशद करा. 20

(*b*) 'दलित साहित्य हे दलित चळवळीचे साहित्य आहे' या विधानाची सार्थकता पटवून द्या. 15

(*c*) स्वातंत्र्योत्तर मराठी समीक्षेच्या वाटचालीतील विविध प्रवाहांची ओळख करून द्या. 15

**8.** पुढील प्रश्नांची उत्तरे लिहा :

(*a*) बखर म्हणजे काय? 'सभासदाची बखर' मधून शिवाजी महाराजांचा जीवनपट कसा साकार झाला ते वर्णन करा. 20

(*b*) 'महात्मा जोतीराव फुले यांच्या साहित्याने मराठी साहित्याच्या आशय-अभिव्यक्तीचे स्वरूप बदलले' या विधानाची चर्चा करा. 15

(*c*) '१८५० ते १९५० या काळात प्रबोधन-परिवर्तनाच्या चळवळीने सामाजिक-सांस्कृतिक आणि वाङ्मयीन बदल घडून आला' या विधानाची सार्थकता स्पष्ट करा. 15

★ ★ ★

www.prepp.in